**रजि.पोस्टाने**

जा.क्र./अभिलेख/ 8488 /२०२६
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड,
दिनांक :– २९/०४/२०२६

**प्रति,**

| | |
|---|---|
| १ | खान ट्रेडर्स, बेस्ट पेपर मार्ट गव्हर्नमेंट मिल्स सप्लायर्स लेबर कॉलनी लातूर. |
| २ | केसरोददीन शेख दाउद घर नं.१/१७/३२ मोमिनपुरा औरंगाबाद. |
| ३ | मॅनेजर महाराष्ट्र हॅन्ड पेपर मॅनिफक्चरर ॲन्ड डाय पेपर पल्प सप्लायर्स सेंटर, कागजीपुरा, ता. खुलताबाद जिल्हा औरंगाबाद. |
| ४ | जिजोयोद्रदीन फेज बक्ष पन्नीपुरा दौलताबाद, ता. जि. औरंगाबाद. |
| ५ | आनंद ट्रेडर्स, मु.पो. कागजीपुरा, ता. खुलताबाद, जि.औरंगाबाद. |
| ६ | महंमद मुसा कागजी मु.पो. कागजीपुरा, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद. |
| ७ | व्यावस्थापक मुद्रणालय विभाग येरवडा जेल पुणे. |
| ८ | एम. अतीक, ए. ए. स्क्रॅप मर्चंट, अजीज पुरा बीड. |
| ९ | ए.एम. स्क्रॅप मर्चंट, बार्शी रोड विद्यानगर बीड. |
| १० | कोशीश सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत बीड. |
| ११ | न्यु आदर्श स्क्रॅप बीड, काजीनगर बालेपीर, नगर रोड बीड, राणी किराणा जवळ बीड. |
| १२ | संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, बीड यांच्या कडे जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी. |
| १३ | स्थळप्रत. |

| | |
|---|---|
| **विषय** :– | जिल्हा न्यायालय, बीड येथील रद्दी (टाकाऊ कागद) खरेदी करीता निविदा पाठविणे बाबत. |

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड व इतर सर्व तालुका न्यायालयासह अभिलेख कक्षातील नाश केलेले रददी (टाकाऊ कागद) व न्यायालयाच्या पुस्तकांचे निर्लेखन केल्यामुळे ग्रंथालय विभागातील रद्दी विक्री करणे आहे.

तरी आपणांस रददी खरेदी करणे असल्यास आपण सदरची रद्दी कोणत्या किंमती मध्ये खरेदी करणार आहात याची बंद लिफाफ्यात निविदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, बीड यांचे नांवे जिल्हा न्यायालय, बीड येथे **दिनांक १२/०५/२०२६** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहचतील या बेताने पाठविण्यात यावे त्यानंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

सदर निविदा **दिनांक १४/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता उघडल्या जातील. निविदा सोबत आपण सरकार मान्य रददी खरेदीदार असल्या बाबतचा आज पर्यंतचा कागदी पुरावा दाखल करावा.

रददी विक्रीस योग्य किंमत न आल्यास निविदा नाकारण्याचा हक्क राखुन ठेवण्यात आलेला आहे.

बीड
दिनांक :— २९/०४/२०२६

आदेशावरुन

29/4/2026

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, बीड.

**<u>सोबत :—</u>** १. जाहिर प्रगटन

## <u>जिल्हा न्यायालय अभिलेख विभाग, बीड.</u>
## <u>जाहिरप्रगटन</u>

**रद्दी खरेदी दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागु राहतील.**

१. प्रत्येक निविदाकारास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.

२. या कार्यालयाच्या फायदयाच्या दृष्टीने सर्वात जास्त किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येईल.

३. रददी खरेदीवर निविदाकाराला अधिकृत खरेदीदार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर असणे आवश्यक आहे.

४. निविदाकाराला दरपत्रका सोबत निविदाकाराचे पॅनकार्डची छायांकित प्रत देणे बंधनकारक राहील.

५. दरपत्राकामध्ये सर्व प्रकारच्या चार्जेसचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

६. सदर रद्दी कार्यालयातुन वाहतुक करणे करीता कार्यालया मार्फत वाहन भाडे, हमाली व इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच तालुका न्यायालयातील रद्दीही त्यांना स्वखर्चाने उचलावी लागेल, त्यासाठीही खर्च कुठलाही देण्यात येणार नाही.

७. कार्यालयात गठीत समिती समोर रद्दी मोजण्यात येईल.

८. दरपत्रक सादर करणा—या निविदाकारांचा या कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा याची नोंद घ्यावी.

९. दरपत्रक सादर करतांना त्यामध्ये संदर्भाचा उल्लेख करणे बंधनकारक आहे.

१०. रद्दी न्यायालयाच्या आवाराबाहेर नेल्यानंतर त्यांच्या विल्हेवाटी संदर्भात सर्व जबाबदारी संबंधित रददी खरेदीदाराची राहील.

११. मोहरबंद दरपत्रके ही जिल्हा न्यायालय, बीड गठीत केलेल्या समिती यांचे समक्ष **दि. १४/०५/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१, बीड यांचे निजी कक्षात उघडण्यात येतील. जर तांत्रीक अडचण निर्माण झाल्यास दुस—या दिवशी ठरलेल्या वेळेत व ठिकाणी समितीपुढे उघडण्यात येतील.

१२. <u>निविदा/दरपत्र</u>क **दिनांक १२/०५/२०२६** पर्यंत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील प्राप्त <u>निविदा/दरपत्र</u>क **दिनांक १४/०५/ २०२६** रोजी गठीत समिती समोर उघडण्यात येतील. यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या

ओळखपत्रासह हजर राहु शकतो. प्रशासकीय व कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य झाले नाहीतर लगतच्या दिनांकास अथवा कार्यालयाच्या सोयीनुसार ठरवुन दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील.

१३. सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा संपुर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड राखुन ठेवत आहेत.

१४. दिलेल्या मुदतील आपले दरपत्रक या कार्यालयास सादर न झाल्यास वरील संपुर्ण अटी आपणास मान्य नाहीत असे समजण्यात येईल.

१५. सदर दर पत्रक मंजुर झालेल्या तारखेपासुन एक वर्षाच्या कालावधी करीता वैध राहील.

१६. जिल्हा मध्यवर्ती अभिलेख कक्षात जमा झालेली रददी ही दरमहा घेवुन जाणे संबंधीत ठेकेदारास बंधनकारक राहील.

तरी संबंधीत ठेकेदारांना सुचित करण्यात येते की, सदर रद्दी खरेदी करण्याकरीता आपली सिलबंद निविदाचे पॉकेटवर **"रद्दी खरेदी बाबत निविदा"** असे स्पष्टपणे नमुद करावे व दरपत्रक मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, जिल्हा न्यायालय, बीड यांचे नांवे लवकरात लवकर सादर करावी.

आदेशावरुन

29/5/2024

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, बीड.